**नियमित दिवाणी दावा क्र.५०८/२०१०**

**अशोक वि. उल्हास**

**निशाणी क्र. १७४**

**<u>वादीतर्फे साक्षीदार क्र.४ चा पुरावा शपथेवर सुरु....</u>**

माझे नांव – श्री. सुरज नागनाथ सुर्यवंशी

वय – ३४ वर्षे,

धंदा – नोकरी (रचना सहाययक) विशेष भुमि संपादन अधिकारी कार्यालय क्र. १६, पुणे.

राहणार – आंबेगाव पठार, पुणे.

**<u>वादीतर्फे साक्षीदार क्र.४ चा सरतपास विधीज्ञ श्री. आर. आर. भोंडे यांचेमार्फत शपथेवर सुरु...</u>**

**०१.** मी दि.१२/०१/२०२४ पासून उपरोक्त कार्यालयात रचना सहाययक म्हणून कार्यरत आहे. आमच्या कार्यालयास न्यायालयाचे साक्षी समन्स प्राप्त झाले त्याप्रमाणे मी आजरोजी साक्षीकरीता हजर आहे. तसे अधिकार पत्र मी पुरसिस **<u>नि.क्र.१७५</u>** सोबत दाखल केलेले आहे. आमच्या कार्यालयाचे शासनाच्या आदेशाप्रमाणे जमिनी संपादन करणे, संपादित जमिनीचा मोबदला ठरवणे व संपादित जमिनीच्या मालकास अदा करणे असे कामकाज आहे. हे मला सांगता येणार नाही की, सर्वे नं.२४/१०/३ हा प्रतिवादी उल्हास बबन कवडे व इतर यांच्या मालकीचा होता अथवा नव्हता, तसेच सर्वे नं.२४/१०/४ हा वादी अशोक मारोती गोफणे व इतर यांच्या मालकीचा होता अथवा नव्हता. सर्वे नं.२४/१०/३ चे संपादित क्षेत्र १२२० चौ.फू. असल्याचे अभिलेखावरुन दिसून येते. तसेच सर्वे नं.२४/१०/४ चे संपादित क्षेत्र ७८० चौ.फू. असल्याचे अभिलेखावरुन दिसून येते. उपरोक्त दोन्ही सर्वे मधील क्षेत्र शासनाने सार्वजनिक शौचालय याकरीता संपादित केलेले होते. साक्षी समन्समध्ये कमी–जास्त पत्रक घेवून साक्षीस येण्याबाबत नमूद

होते. मात्र कमी–जास्त पत्रक भुमि अभिलेख कार्यालयात असते आमच्या कार्यालयात नसते म्हणून ते मी सोबत आणलेले नाही.

**सरतपास संपला.**

**<u>उलटतपास प्रतिवादीकरीता विधीज्ञ श्री.एम. टी. पिसे –</u>**

मी सरतपासात संपादित क्षेत्राबाबत जे काही सांगितलेले आहे ते संपादित क्षेत्राबाबत प्रकरणावरुन सांगत आहे. कमी–जास्त पत्रक भुमि अभिलेखक कार्यालय तयार करते.

श्रवणोत्तर स्विकृत,

SUPEKAR ASHOK UMAJI

Digitally signed by SUPEKAR ASHOK UMAJI
Date: 2026.07.18 17:32:15 +0530

पुणे **(अशोक उ.सुपेकर)**

दिनांक –१८.०७.२०२६ १३ वे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,

पुणे